# नवीन शैक्षणिक धोरण पुढच्या वर्षी लागू होणार

## युजीसीकडून डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी राज्य सरकारने डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीने दिलेल्या सूचनांनुसार राज्यातील सर्व विद्यापीठे एकाचवेळी नवीन शैक्षणिक धोरण लागू करणार आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरण २०२३-२४ या शैक्षणिक कालावधीमध्ये लागू केले जाणार, अशीच सध्या परिस्थिती आहे. तरीही पुर्व तयारी म्हणून शिवाजी विद्यापीठात विविध समित्यांची नेमणूक केली आहे. शिवाजी विद्यापीठात गेल्या पाच वर्षापासून 'चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टम' लागू केली असल्याने, सूचना आल्यानंतर त्वरीत नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यास विद्यापीठ सज्ज आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात सरकारी अनुदान बंद करून खाजगी गुंतवणुकीला महत्व दिले आहे. त्यामुळे देशभरातील ८०० विद्यापीठ आणि ४० हजार शिक्षण संस्था बंद करून फक्त १५ हजार शिक्षण संस्था आर्थिक स्वायत्तता धोरणावर चालवल्या जातील. या धोरणामुळे ३ ते १८ मोफत सक्तीचे शिक्षण मिळणार ही एकच चांगली गोष्ट आहे. पण नवीन शैक्षणिक धोरण लोकसभेत येण्यापुर्वी समाजाच्या सर्व पातळीवरून विरोध झाला. तरीही नवीन शैक्षणिक धोरणावर मागवलेल्या २ लाख सूचनांना केराची टोपली दाखवत, केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण लोकसभेत एकमताने मंजूर केले आहे. त्यामुळे २०२३ पासून नवीन शैक्षणिक धोरण लागू केले जाणार आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बहुतांश महाविद्यालये स्वायत्त झालेली आहेत. त्यामुळे स्वायत्त महाविद्यालयांनी आपला अभ्यासक्रम मुळाच कौशल्यावर आधारीत केला आहे. तसेच विद्यापीठाला नॅकचे एप्लसप्लस मानांकन असल्याने विद्यापीठाने 'कॅटॅगिरी वन'साठी युजीसीकडे प्रस्ताव पाठवला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यास विद्यापीठालाही स्वायत्तता मिळेल. त्यानंतर सध्या असलेल्या कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमात आणखीनच भर पडणार आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे जवळपास ८० टक्के कामकाज पूर्ण झाल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात आहे.

शिवाजी विद्यापीठातील बहुतांश व्यवसायिक अभ्यासक्रम कौशल्यावर आधारीत आहेत. तसेच विद्यापीठाला नॅकचे एप्लसप्लस मानांकन असून, संशोधनात जागतिक पातळीवर पहिल्या दीडशेमध्ये क्रमांक आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी फार वेगळी तयारी करावी लागणार असे काहीच नाही. डॉ. माशेलकर यांच्या समितीच्या सूचनांच्या प्रतिक्षेत शिवाजी विद्यापीठ आहे.

### अंमलबजावणीसाठी नियोजनाची गरज

देशभरात एकच शैक्षणिक धोरण असल्याने केजी टू पीजीपर्यंत संपूर्ण नियोजन करण्याची गरज आहे. प्रत्येक शिक्षणातील टप्यातील संदिग्धता दूर करण्यासाठी ॲकॅडमीक क्रेडीट बँक तयार केली पाहिजे. शिक्षण कायद्यानुसार अभ्यासक्रम बदलणे, रचना बदलणे याला गती येण्याची गरज आहे. त्यासाठी राज्यपाल भवन, शिक्षण खाते, विद्यापीठांनी एकत्रित बैठक घेवून नवीन शिक्षण कायद्यात कोठून सुरूवात करायची हे स्पष्ट केले पाहिजे. चार वर्षाची पदवी करताना समकक्षता कशी द्यायची, तीन हजारपेक्षा कमी विद्यार्थी असतील तर त्या कॉलेजचे काय करायचे यासंदर्भात युजीसी, एआयसीटी, बार कौन्सिल ऑफ इंडिया, फार्मसी कौन्सिल ऑफ कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर अशा शिखर संस्थांचा विचार केला पाहिजे, असे शिक्षण तज्ज्ञांचे मत आहे.

### शिवाजी विद्यापीठ एक पाऊल पुढे

शिवाजी विद्यापीठात बेस्ड क्रेडीट सिस्टम गेल्या पाच वर्षापासून लागू आहे. इंजिनिअरिंग, आर्किटेक्ट, फार्मसी या विभागांना मुळातच चार वर्षांनी पदवी मिळते, ही जमेची बाब आहे. तसेच संशोधातही विद्यापीठ नंबर वन असल्याने नवीन शिक्षण कायद्यातील आव्हाने पेलण्यास विद्यापीठ सज्ज आहे. शिवाजी विद्यापीठाने अंमलबजावणीसाठी समित्या तयार केल्या आहेत. शासनाच्या सूचना येतील त्याप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल

**-प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील (शिवाजी विद्यापीठ)**

**तरुण भारत** विशेष वृत्त

### नवीन शैक्षणिक धोरणाविषयी या आहेत अटी

- पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी चार वर्षाचा करणे
- ज्या शैक्षणिक संस्थांना पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत, त्या संस्थांना विद्यापीठाचा दर्जा देणे.
- डिजिटल शिक्षण देणे,
- उच्च शिक्षणासाठी संशोधन व नवोपक्रम परिषद स्थापन करणे.
- कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम तयार करून रोजगार निर्मितीवर भर देणे.
- चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टम पध्दतीचा वापर करणे.

03 JUN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाटली अवकाशातील तबकडी, पण निघाला फुगा..!

## हवामानाच्या अभ्यासासाठी सोडला फुगा : कोल्हापूरमधील लोकांमध्ये मात्र वाढले कुतूहल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोल्हापूरकरांना गुरुवारी सकाळी एक विशिष्ट चमकणारी गोल वस्तू अवकाशात पूर्वेकडून पश्चिमेकडे जाताना दिसली. अवकाशातून तबकडी जाताना दिसत आहे, हे पाहताच लोकांनी त्याचे व्हिडीओ व फोटोही घेतले; मात्र ही चमकणारी तबकडी नसून हवामान खात्याने अभ्यासासाठी सोडलेला फुगा (बलून) होता, हे चौकशीनंतर स्पष्ट झाले.

गुरुवारी सकाळी ६ वाजून ५ मिनिटांपासून ६.५० पर्यंत हा फुगा अवकाशात कोल्हापूरकरांना पाहता आला. उंचावर असल्याने जमिनीवरून या फुग्याचा वेग हळूहळू सरकत असल्यासारखा वाटला; त्यामुळे गूढ, 'उडणारी तबकडी' समजून लोकांचे कुतूहल वाढले. सध्या मान्सूनचे वारे वाहत आहेत. हवामान खात्याच्या माध्यमातून हवामानाच्या अभ्यासासाठी असे फुगे सोडण्यात येतात. याद्वारे हवेचे तापमान, आर्द्रता, वेग, दिशा यांचा अभ्यास केला जातो. फुग्याबाहेर असणाऱ्या उपकरणांच्या माध्यमातून रेडिओ लहरींद्वारे संकलित केलेली माहिती त्या अवकाश केंद्राला पाठविली जाते.

पुढे हा फुगा लांब अंतरावर जाऊन फुटतो. तथापि याच फुग्यामुळे कोल्हापूरकरांची सकाळ तबकडी बघत सुरू झाली; पण तो निघाला हवामान खात्याचा फुगा..!

“ ही तबकडी नसून अभ्यासाला पाठविलेला फुगा आहे. हे फुगे फार उंचावरून जातात. हवामानाच्या अभ्यासासाठी मुख्यत: हा फुगा पाठविला असून गोव्याकडून तो कोल्हापूरकडे आला आहे. प्रामुख्याने हा फुगा गोवा अवकाश संशोधन केंद्राचा असावा.

**- राजीव व्हटकर,**
संचालक, पन्हाळा अवकाश संशोधन केंद्र संचालक, शिवाजी विद्यापीठ



कोल्हापुरात अवकाशात गुरुवारी सकाळी उडती तबकडी असा कोल्हापूरकरांचा समज झालेला. पण प्रत्यक्षात हवामान खात्याकडून अभ्यासासाठी सोडण्यात आलेला फुगा व त्याचे उपकरण.
(छाया : आदित्य वेल्हाळ )

लोकसत्ता

# 'ती' तबकडी नव्हे बलून; संशोधकांचा खुलासा

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** करवीर, पन्हाळा तालुक्यातील काही लोकांना गुरुवारी पहाटे अवकाशात तबकडी सदृश्य वस्तू दिसली. यामुळे त्यांच्यामध्ये कुतूहल निर्माण झाले होते. तथापि या विषयाच्या अभ्यास संशोधकांनी हा हवामानाचा अभ्यास करणारा फुगा (बलून) असल्याचा निर्वाळा दिला आहे.

करवीर पश्चिम तसेच पन्हाळा तालुक्यातील लोकांना पहाटेच्या सुमारास उंच ठिकाणी पांढराशुभ्र तबकडी सदृश्य वस्तू दिसून आली. त्यामुळे त्यांच्यामध्ये ही तबकडी नेमकी कशाची असावी यावरून मतमतांतरे व्यक्त होत राहिली. समाज माध्यमातून याबाबतच्या चित्रफिती अग्रेषित होत राहिल्याने त्यावरून ही चर्चेचे वादळ घोंगावत राहिले.

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाने पन्हाळा येथे अवकाश संशोधन केंद्र स्थापित केले आहे. या केंद्राचे संचालक डॉ. राजीव व्हटकर यांनी ही तबकडी नव्हे तर हवामान विभागाचा वेध घेणारा फुगा असल्याचा निर्वाळा दिला आहे. ते म्हणाले. गोवा येथील हवामान केंद्राने सोडलेला हा फुगा असावा. तो मान्सूनच्या वाऱ्यामुळे तरंगत या भागात आला असावा. याकरवी हवेतील तापमान, आर्द्रता, दाब, वेग, दिशा याचा वेध घेऊन त्याची माहिती हवामान केंद्राला पाठवली जाते. हा फुगा फुटून जमिनीवर कोसळू शकतो. मात्र त्यामुळे घाबरून जाण्यासारखे काही नाही, असेही त्यांनी नमूद केले.

पुढारी

# ‘खेलो इंडिया’ आंतरविद्यापीठ स्पर्धेतील पदकविजेत्यांचा विद्यापीठात गौरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडापटूंनी दुसऱ्या खेलो इंडिया स्पर्धेत बजावलेली कामगिरी उत्साहवर्धक असून पुढील काळात त्यांची कामगिरी उंचावत राहावी, अशा अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली. द्वितीय राष्ट्रीय खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेत विविध क्रीडाप्रकारांत पदक प्राप्त क्रीडापटूंचा गौरव समारंभ बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या सभागृहात झाला. यावेळी ते बोलत होते.

दुसऱ्या खेलो इंडिया स्पर्धेमध्ये विविध क्रीडाप्रकारांत शिवाजी विद्यापीठाच्या ८६ क्रीडापटूंनी सहभाग घेतला. त्यामध्ये ८ सुवर्ण, ७ रौप्य व ७ कांस्य अशी २२ पदके प्राप्त केली. पदकप्राप्त क्रीडापटूंना कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाचे स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. क्रीडा अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

स्पर्धेतील पदकविजेत्यांची नावे (कंसात अनुक्रमे क्रीडाप्रकार व पदक) : वैयक्तिक क्रीडाप्रकार : तेजस जोंधळे (वेटलिफ्टिंग, सुवर्ण), साक्षी रानमळे (वेटलिफ्टिंग, सुवर्ण), सरिता सावंत (वेटलिफ्टिंग, रौप्य), प्रतीक्षा साठे (वेटलिफ्टिंग, कांस्य), ऋतुजा खाडे (स्विमिंग, तीन सुवर्ण (५० मी. फ्रीस्टाईल, १०० मी. फ्रीस्टाईल व ५० मी. बटरफ्लाय)), गौरव चव्हाण (स्विमिंग, कांस्य), धनंजय जाधव (तलवारबाजी, कांस्य), ऋषीकेश पाटील (फ्रीस्टाईल कुस्ती, कांस्य), नंदिनी साळोखे (फ्रीस्टाईल कुस्ती, कांस्य), रोहन कांबळे (ॲथलेटिक्स (४० मी अडथळे), सुवर्ण), विकास खोडके (ॲथलेटिक्स (११० मी. अडथळे), सुवर्ण), सिद्धांत पुजारी (३००० मी. स्टेपल्स चेस), कांस्य), स्नेहा जाधव (हातोडा फेक), कांस्य), ज्ञानेश्वरी (नेमबाजी, कांस्य). सांघिक : योगा (पुरुष): मनन कासलीवाल, अभिजित सावंत, अनिकेत म्हेत्रे, ऋषीराज माने, घननीळ लोंढे व ओंकार दाभोळे (सर्वांना रौप्य).

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ परीक्षा मूल्यमापन मंडळ संचालक पदाच्या आज मुलाखती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन संचालक मंडळाच्या पदासाठी शुक्रवारी मुलाखती होणार आहेत. तत्कालीन परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांचा कार्यकाल दि. २२ जुलै २०१९ रोजी संपला. तो कार्यभार जी. आर. पळसे यांच्याकडे गेल्या तीन वर्षांपासून आहे. पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये तत्कालीन परीक्षा नियंत्रक महेश काकडे, माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह दत्तात्रय नवले, हेमंत उमाप, राजेंद्र पाटील, श्रीकांत अंधारे, चंद्रकांत जाधव, मलिक रोकडे, सुजाता आडमुठे, भरत पाटील, शंकर खाडे, नितीन जवारे, शामला महाडिक, सुहास पाटील, प्रकाश पाटील, अजितसिंह जाधव, बाजीराव पाटील यांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठातील प्रशांत अनभुले, मुरलीधर भानरकर या प्राध्यापकांचा समावेश आहे.

0 3 JUN 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उडती तबकडी की बलून..?

## पन्हाळा परिसरात चर्चेला उधाण; सांगली सीमेवरही दर्शन

**पन्हाळा : राजू मुजावर**

पन्हाळगडावर गुरुवारी सकाळी तब्बल दोन तास पश्चिमेला आकाशात बलूनसदृश पांढरा शुभ्र गोल अचानक दिसला. हा गोल अत्यंत सावकाशपणे पुढे सरकत असल्याचे जाणवत होते. दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे संचालक डॉ. प्रा. राजीव व्हटकर यांनी हा मान्सूनच्या अभ्यासासाठी सोडलेला बलून असावा, असा अंदाज व्यक्त केला आहे. दरम्यान, गुरुवारी दिवसभर सर्वत्र याचीच चर्चा होती.

रमेश पाटील यांनी आपल्या मोबाईलवर याचा व्हिडीओ बनवला. डोळ्याने दिसणाऱ्या विमानापेक्षाही उंच अंतरावरून ही तबकडीसदृश वस्तू आकाशातून सावकाश पुढे सरकत होती. पांढऱ्या रंगाची ही वस्तू तबकडी की बलून, असा संभ्रम आहे. नवे पारगाव येथील प्रा. चंद्रकांत राजे, प्रा. प्रवीण पगारे यांनी दोन तास त्याचे निरीक्षण केले. हा प्रखर चमकत असलेला गोल उत्तर दिशेला सरकत गेला आणि मग पन्हाळ्यातून दिसेनासा झाला, असे पाटील यांनी सांगितले.



**पन्हाळा : येथे आकाशात गुरुवारी सकाळी दिसलेली पांढरी शुभ्र बलूनसदृश तबकडी.**


### हवामान खात्याचा बलून असावा

दोन दिवसांत मान्सून सुरू होणार आहे. त्या दृष्टीने वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी असे बलून सोडले जातात. जगभरात दररोज असे बलून सोडून हवामानाचा अंदाज घेतला जातो. आर्द्रता, वाऱ्याची दिशा तपासली जाते, या बलूनमध्ये खालील बाजूस हवामानाचा अंदाज घेण्यासाठी उपकरण बसवलेले असते. हा बलून नंतर फुटतो व याला बसवलेले उपकरण खाली पडते. जीपीएस यंत्रणेमुळे हे उपकरण पडल्याचे नेमके स्थान कळते. तेथून हे उपकरण ताब्यात घेतले जाते. पश्चिमेला दिसलेला हा बलून कदाचित गोवा हवामान खात्याने सोडला असावा, असे डॉ. व्हटकर यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. राजीव व्हटकर सध्या गुवाहाटी (आसाम) येथे आहेत. त्यांच्याशी संपर्क साधून या आकृतीचे फोटो, व्हिडीओ त्यांना पाठवण्यात आले. ते पाहून डॉ. व्हटकर यांनी आकाशात दिसलेला हा तेजस्वी गोळा हवामान खात्याने हवामानाचा अंदाज घेण्यासाठी सोडलेला बलून असावा. सूर्याची किरणे पडल्यावर हा बलून अधिकच चमकतो. त्यामुळे तो अत्यंत प्रखर असा दिसत असावा, असे सांगितले.

सकाळ

# तबकडी नव्हे हवामानाची माहिती घेणारा बलून



कोल्हापूर : गुरुवारी आकाशात हवामान खात्याचा बलून नागरिकांना दिसला.

कोल्हापूर, ता. २ : शहरासह पन्हाळा आणि त्या परिसरात काही जणांना आकाशात एक गोलाकार वस्तू दिसली. ही तबकडी असावी, असा अंदाज काही जणांनी केला. त्याचे व्हिडिओ, फोटो समाज माध्यमांवर टाकले गेले. त्यामुळे हे नेमके काय आहे, याची चर्चा सर्वत्र सुरू झाली. अखेर ही तबकडी नसून हवामान खात्याचा बलून असल्याची माहिती अवकाश तज्ज्ञांनी दिली.

मॉर्निंग वॉक करण्यासाठी नागरिक रंकाळ्याला फेरफटका मारत होते. यावेळी काही राजकपूर पुतळ्यानजीक असलेल्या बागेत व्यायाम करत होते. त्यांना आकाशात एक गोल आकाराची वस्तू दिसली. पांढऱ्या रंगाची ही वस्तू तबकडीसारखी वाटत होती. पन्हाळ्यावरही काही नागरिकांना ही तबकडीच्या आकाराची वस्तू दिसली. काही वेळातच समाजमाध्यमांवर याचा व्हिडिओ व्हायरल झाला. त्यामुळे

> “ हवामानाची माहिती, मॉन्सूनची स्थिती हे पाहण्यासाठी हवामान खात्याने एक बलून अवकाशात सोडलेला असतो. त्यावर सूर्य किरणे पडली की तो चमकतो आणि एखाद्या ताऱ्यासारखा भासतो. मात्र, हा तारा किंवा तबकडी नसून माहिती घेण्यासाठी अवकाशात सोडलेला बलून आहे.
>
> **- डॉ. राजीव व्हटकर**, संचालक, अवकाश संशोधन केंद्र, पन्हाळा

तबकडी दिसल्याची चर्चा सर्वत्र सुरू झाली. अखेर शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. राजीव व्हटकर यांनी ही तबकडी नसून हवामानाची माहिती घेण्यासाठी सोडलेला बलून असल्याचे सांगितले.

सकाळ

# परीक्षा मंडळ संचालक पदासाठी आज मुलाखत

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा संचालक पदासाठी आज (ता. ३) मुलाखती होणार आहेत. यासाठी २० हून अधिक जणांच्या मुलाखती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह समिती सदस्य घेतील.

शिवाजी विद्यापीठाच्या परिक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक निवडीसाठी विद्यापीठात मुलाखती घेतल्या जाणार आहेत. यासाठी अर्ज मागण्यात आले होते. डॉ. भारती पवार यांच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या समितीने आलेल्या अर्जातून छाननी



करून सुमारे २० जणांची मुलाखतीसाठी निवड केली. यांच्या मुलाखती आज होणार आहेत. मुलाखत घेण्यासाठी कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीमध्ये व्यवस्थापन मंडळाचे २ सदस्य, २ विषय तज्ज्ञ आणि २ मागासवर्गीय प्रतिनिधी असणार आहेत. त्यांच्यासमोर मुलाखत होईल. विद्यापीठातील रिक्त पदांसाठी या आठ दिवसात मुलाखती होणार आहेत.

0 3 JUN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षा संचालक पदासाठी आज मुलाखती

## शिवाजी विद्यापीठात १७ जून पर्यंत कुलसचिव, विविध अधिष्ठाता पदांच्या होणार मुलाखती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक पदासाठी शुक्रवारी, ३ रोजी मुलाखती आहेत. या पदासाठी १९ उमेदवार पात्र असून, त्यांच्या मुलाखती आठ सदस्यीय तज्ज्ञ समिती घेणार आहे.

विद्यापीठातील कुलसचिव पदासाठी शनिवारी ४ रोजी मुलाखती होणार आहेत. या पदासाठी २१ उमेदवार पात्र ठरले होते. माजी परीक्षा संचालक महेश काकडे, माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचेही अर्ज पात्र ठरले आहेत. त्यामुळे पात्र उमेदवारांचा आकडा २३ वर पोहचला आहे. तक्रारदारांनी चुकांची दुरूस्ती करीत मुलाखतीस पात्र ठरवल्याने या वादावर पडदा पडला आहे. उमेदवारांनीही मुलाखतीला येण्यापुर्वी कागदपत्रांची जुळवाजुळव केली असून, प्रश्नोत्तराचीही तयारी झाली आहे.



**परीक्षा संचालक पदासाठी पात्र उमेदवार**

दत्तात्रय नवले, हेमंत उमप, राजेंद्र पाटील, सुर्यकांत अंधारे, चंद्रकांत जाधव, महेश काकडे, मलिक रोकडे, मधुकर भानारकर, सुजाता आडमुठे, भारत पाटील, शंकर खाडे, नितीन झावरे, शामल महाडीक, प्रशांत अनुभुले, सुहास पाटील, विलास नांदवडेकर, प्रकाश पाटील, अजितसिंह जाधव, बाजीराव पाटील.

**कुलसचिवपदासाठी पात्र उमेदवार**

हेमंत जाधव, मोहन अबदार, राजकुमार पल्हाडे, जयदीप बागी, धनंजय ठोंबरे, नितीन झावरे, सुजाता आडमुठे, भारत पाटील, विनायक वडगावकर, प्रभाकर रामटेके, विलास शिंदे, प्रताप हलकर्णीकर, प्रकाश पाटील, मधुकर भानारकर, धर्मेश पराते, रविंद्र मुळे, अजितसिंह जाधव, सुरेश शिरबहाद्दुरकर, लालासाहेब जाधव, विजय खोत, बाजीराव पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे.

विद्यापीठातील कुलसचिव, परीक्षा संचालक, विविध अधिष्ठाता, केंद्र संचालक पदाच्या मुलाखती घेण्यासाठी आठ सदस्यीय समिती गठीत केली आहे. समितीमध्ये दोन कुलगुरू, विषय तज्ज्ञ, दोन व्यवस्थापन सदस्य, एक मागासवर्गीय सदस्य, एक उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा सदस्य आणि प्र-कुलगुरू आहेत.